सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❏ वर्ष - ४ थे ❏ अंक - ८९ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ गुरुवार दि. १४ मे २०२६ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -४

## परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत इंधन वाचवा

## मोदींवर जितकी टीका कराल, तितकेच खड्ड्यात जाल,

### देशहिताच्या निर्णयावर टीका करणे काँग्रेसची सवय- शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

सुरक्षेच्या दृष्टीने ज्या गाड्या गरजेच्या आहेत त्या आमच्या ताफ्यात आहेत. बाकी गाड्या आम्ही कमी केल्या आहेत. इंधन बचतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे आवाहन केले आहे, त्याला सर्वांनी प्रतिसाद दिला पाहिजे. यामध्ये कोणीही राजकारण करू नये. आपल्यासाठी देश सर्वांत पहिले असला पाहिजे, असे शिंदेंनी म्हटले आहे. परिस्थिती पूर्ववत होत नाही तो पर्यंत आपण इंधन बचत केली पाहिजे. गरज असेल तिथे प्रवास केला जाईल जिथे गरज नाही तिथे प्रवास होणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की,



राहुल गांधी यांच्याबद्दल मी काय बोलावे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ज्या ज्यावेळी देशहिताचा निर्णय घेतात त्यावेळी त्यांच्यावर टीका करत असतात. काँग्रेसने १०० हून अधिक वेळा पंतप्रधान मोदी यांच्यावर आरोप केले आहेत. पण आता काँग्रेसची काय परिस्थिती आहे? हे जितके मोदी यांच्यावर टीका करतील जनता तितकीच त्यांना धडा शिकवेल, राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विदेश दौऱ्यावर केलेल्या टीकेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी असे म्हटले आहे.

#### म्हणून काँग्रेस खड्ड्यात जातंय

एकनाथ शिंदे म्हणाले की, पश्चिम बंगाल आणि आसाम निवडणुकीच्या निकालाने जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत आहे हे दाखवून दिले आहे. त्यामुळे काँग्रेस पीएम मोदींवर जितके आरोप करेल तितकेच ते खड्ड्यात जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहानानंतर एकनाथ शिंदे हे ई कारने विधानभवनात दाखल झाले आहेत.

**सावे, राणेंचा मंत्रालयापर्यंत पायी प्रवास-** दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहानानंतर नीतेश राणे यांनी मंत्रालयापर्यंत पायी प्रवास केला. यावेळी बोलताना नीतेश राणे म्हणाले की, मंत्रिमंडळ बैठकीसाठी मी पायी मंत्रालयात जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेपर्यंतचा प्रवास हा दुचाकीवर केला आहे. आम्ही आमच्या ताफ्यातील गाड्या कमी केल्या आहेत. म्हणून देशाच्या सर्वच लोकांनी काटकसर केली पाहिजे. यामध्ये कोणत्याही पक्षाने राजकारण करू नये. हा काही राजकारण करण्याचा विषय नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून ते आवाहन केले आहे. प्रत्येक नागरिकाने ते पाहिले पाहिजे. सर्वांनी केवळ नागरिक म्हणून याकडे पाहिले पाहिजे. आमच्या ताफ्यात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून दोन गाड्या ठेवाव्या लागतात. त्या ठेवाव्याच लागतात. मी एत वापरण्यास सुरूवात केली आहे. तर मंत्री अतुल सावे यांनी सुद्धा आपल्या शासकीय निवासस्थानापासून ते मंत्रालयापर्यंत पायीप्रवास केला.

## विधान परिषदेच्या नवनिर्वाचित

## १० आमदारांचा शपथविधी



### सभापती राम शिंदे यांनी दिली पद आणि गोपनीयतेची शपथ; भाजपचे सर्वाधित ६ आमदार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई** महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्विवार्षिक आणि पोटनिवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या १० नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा आज विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात दिमाखात पार पडला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या सर्व नवनियुक्त आमदारांना सदस्यत्वाची शपथ दिली.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील महत्त्वाचे सदस्य उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दीकी यांनी इंग्रजीमधून आमदारकीची शपथ घेतली.

#### पक्षनिहाय शपथ घेणाऱ्या सदस्यांची यादी

भारतीय जनता पार्टी (भाजप): प्रमोद जठार, सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रज्ञा सातव (पोटनिवडणूक).

शिवसेना (एकनाथ शिंदे गट): डॉ. नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट): अंबादास दानवे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): झिशान सिद्दिकी.

विधान परिषदेच्या एकूण १० जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली होती. यामध्ये ९ जागांसाठी नियमित निवडणूक, तर एका जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली होती. १२ मे २०२६ रोजी मतदान होणार होते, मात्र १० जागांसाठी केवळ १० उमेदवारांचेच अर्ज आल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली. यामध्ये भाजपचे संख्याबळ अधिक असल्याने त्यांच्या वाट्याला सर्वाधिक ६ जागा आल्या, तर शिंदे गटाने २ आणि अजित पवार गट व ठाकरे गटाला प्रत्येकी १ जागा मिळाली आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस बुलेटवरून विधानभवनात



### अंबादास दानवे यांचाही पायी प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत केलेल्या आवाहनानंतर राज्यातील सत्ताधारी नेत्यांकडूनही त्याची अंमलबजावणी सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज स्वतः बाईक चालवत विधानभवनात दाखल झाले. मुख्यमंत्री बाईकवरून विधानभवनात पोहोचल्याने राजकीय वर्तुळासह सर्वसामान्य नागरिकांमध्येही या निर्णयाची मोठी चर्चा रंगली.

इंधन बचत आणि अनावश्यक ताफे कमी करण्याच्या उद्देशाने त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.



राज्यातील अनेक मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्यात आली असून, सरकारी यंत्रणांकडूनही खर्च नियंत्रणावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतः पुढाकार घेत बाईकचा वापर केल्याने प्रशासन आणि मंत्रिमंडळातील इतर सदस्यांनाही एक वेगळा संदेश दिला गेल्याची चर्चा सुरू आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर तसेच पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सार्वजनिक वाहतूक आणि कमी इंधन वापराच्या पर्यायांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःपासून बदलांची सुरुवात केली असून, शासकीय खर्च कमी करणे, ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षण यावर सरकारने भर दिला आहे. या नव्या निर्णयांमुळे मंत्र्यांचे ताफे, दौरे, प्रवास पद्धती आणि सरकारी कार्यालयांच्या कामकाजात मोठे बदल होणार आहेत. सरकारच्या नव्या आदेशानुसार मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तात्काळ ५० टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज स्वतः बाईक चालवत विधानभवनात दाखल झाले. मुख्यमंत्री बाईकवरून विधानभवनात पोहोचल्याने राजकीय वर्तुळासह सर्वसामान्य नागरिकांमध्येही या निर्णयाची मोठी चर्चा रंगली. परगावी होणाऱ्या दौऱ्यांदरम्यान निश्चित मर्यादेपेक्षा जास्त वाहने वापरली जाणार नाहीत, अशी स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आली आहे.

## व्हीडी सतीशन होतील केरळचे नवे मुख्यमंत्री

### निवडणूक निकालानंतर १० दिवसांनी काँग्रेसची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४तिरुवनंतपुरम-** काँग्रेस नेते व्ही. डी. सतीशन (६१) केरळचे मुख्यमंत्री असतील. राज्याच्या निवडणूक निकालांची घोषणा झाल्यानंतर १० दिवसांनी गुरुवारी काँग्रेसने याची घोषणा केली. सतीशन परावूर मतदारसंघातून आमदार आहेत.

काँग्रेस नेत्या दीपा दासमुंशी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, काँग्रेसने ७ मे रोजी तिरुवनंतपुरममध्ये बैठक घेतली होती. पक्षाध्यक्ष खर्गे आणि



राहुल गांधी यांच्याशी चर्चा केल्यानंतर केरळचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन असतील, असे ठरवण्यात आले.

नावाची घोषणा झाल्यानंतर सतीशन म्हणाले - मी हे पद वैयक्तिक यश नसून दैवी कृपा मानतो. मी वेणुगोपाल, रमेश चेन्निथला यांच्यासह सर्व नेत्यांना विश्वासात घेईन.खरं तर, केरळच्या मुख्यमंत्रीपदासाठी के. सी. वेणुगोपाल, रमेश चेन्नीथला आणि व्ही. डी. सतीशन या तीन नेत्यांच्या नावांची चर्चा होती. शेवटी सतीशन यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

काँग्रेस आमदारांच्या बैठकीत ७५-८०% आमदारांनी केसी वेणुगोपाल यांना पाठिंबा दिला होता. वीडी सतीशन यांना केवळ ६ आमदारांचा पाठिंबा मिळाला होता.

## निवडणुका संपल्यावरच सरकारला गांभीर्य का सुचले?

### सर्वपक्षीय बैठकीत पंतप्रधानांनीही यावे- शरद पवार

### मुख्यमंत्र्यांचेही टोचले कान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत देशातील सध्याच्या परिस्थितीवर भाष्य केले आहे. तसेच केंद्र सरकारवर त्यांच्या सध्याच्या भूमिकेवरून फटकारले आहे. यावेळी बोलताना शरद पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या संदर्भात वापरलेल्या भाषेचाही निषेध केला आहे.

शरद पवार म्हणाले, परिस्थिती गंभीर आहे आणि अशा वेळेला देशाच्या सगळ्या नेत्यांची बैठक बोलवावी आणि त्याला प्रधानमंत्र्यांनी स्वतः हजर राहावे. याच्या आधी गेल्या ३-४ वर्षात सर्व पक्षीय बैठका या झाल्या पण त्यातील एकाही बैठकीत पंतप्रधान नव्हते. पण एकंदर अशी स्थिती गंभीर आहे असे सांगण्याचे काम मुख्यमंत्री प्रधानमंत्री करत आहेत, तर तितक्याच गांभीर्याने सगळ्यांनी मिळून घ्यावी.




#### देशात याआधीही अशी परिस्थिती होती

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, आज मी सकाळपासून टीव्हीवर बघतोय कोणी मोटारसायकलवरुन जात आहे, कोणी चालत जात आहे, एकाने तर जाहीर केले की मी मंत्री आहे आणि माझ्या गाड्या मी कमी केल्या. त्या १७ होत्या आता १७ वरून ८ वर आलो आहे. मला तर धक्काच बसला की १७ गाड्या होत्या आणि कमी केल्यानंतर ८ वर आणल्या. याचा अर्थ या सगळ्यांचा बघण्याचा दृष्टिकोण गांभीर्याचा असला पाहिजे. अशी स्थिती या आधी देशात झाली नव्हती असे नाही, पण ठीक आहे.

**राहुल गांधींसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी वापरलेली भाषा अयोग्य**

शरद पवार म्हणाले, या वेळेला मुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांनी सुद्धा आपली भाषा ही व्यवस्थित वापरली पाहिजे. राहुल गांधींच्या संबंधी मुख्यमंत्र्यांनी जे शब्द वापरले ते अयोग्य होते. राहुल गांधी हे विरोधी पक्ष नेते आहेत आणि तेही संसदेत. विरोधी पक्ष नेता ही संवैधानिक पद आहे आणि ते लोकांमधून येत आहे. त्यामुळे अशी भाषा या पदावर असलेल्या व्यक्तीच्या संबंधी वापरणे हे चुकीचे आहे. या संदर्भात आणखीन मला काही बोलायचे नसल्याचे शरद पवार म्हणालेत.

## १ जुलैपासून वाहनांना HSRP नंबर प्लेट बसविणे अनिवार्य

### नियमभंग केल्यास १ हजार रुपयांचा दंड - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई-** राज्यातील वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी तसेच वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना १ जुलै पासून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे अनिवार्य केले आहे. यासाठी यापूर्वी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र राज्यातील उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसविण्याच्या कामाचा आढावा घेतल्यानंतर वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी आता ही मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट ही अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जुन्या वाहनांनाही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक सुरक्षा नोंदणी क्रमांक (क्ष्ठझ ) क्रमांक प्लेट बसविणे




बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत क्ष्ठझ बसवून घ्यावी.वाहन मालकांनी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन क्ष्ठझ बसविण्यासाठी आगाऊ वेळ निश्चित करावी. संबंधित वाहनधारकांनी ३० जून २०२६ पूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.सरनाईक पुढे म्हणाले की, ज्या वाहनधारकांनी मुदतीत क्ष्ठझ बसवून घेतले नाही किंवा अपॉइंटमेंट नोंदवली नाही, अशा वाहनांची १ जुलै २०२६ पासून रस्त्यावर विशेष तपासणी मोहीम राबवून पडताळणी करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल तसेच १ हजार रुपयांपर्यंत तडजोड शुल्क आकारण्यात येईल.

## संपादकीय ......

# पावसाच्या तोंडावर जाग कशी येते?

*पावसाळा दीड-दोन महिन्यांवर आला की दरवर्षी नालेसफाई आणि धोकादायक इमारतींचा प्रश्न प्रामुख्याने चर्चेला येतो. आपल्याला लोकांची किती काळजी आहे, हे सांगत नालेसफाईची कामे दिली जातात, नेहमीप्रमाणे पाहणी दौरे होतात आणि त्यानंतर रिवाजाप्रमाणे पावसाळ्यात नालेसफाईचा फज्जा उडालेला दिसतो. अगदी वर्षानुवर्षे हे असेच सुरू आहे. धोकादायक इमारतींबाबतही असेच घडत आहे. पावसाळ्यापूर्वी महिनाभर आधी धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर केली जाते, त्यांना घरे रिकामी करण्याच्या नोटिसा बजावल्या जातात. या सर्व प्रक्रिया जणूकाही रिवाज-परंपरा म्हणून सुरू आहे. त्यामुळेच धोकादायक इमारतींबाबत सरकारचे ठोस धोरण आहे का, असा प्रश्न पडतो. कारण धोकादायक किंवा अतिधोकादायक इमारत पाडणे एवढ्यापुरताच हा प्रश्न नसतो. तत्पूर्वी त्या इमारतींमधील रहिवाशांच्या दुसर्या निवार्याचा प्रश्न सुटणे महत्त्वाचे असते. तसेच त्यांची मुले शाळेत जात असतील तर त्यांना शाळेचे अंतर पाहावे लागते. मात्र, बहुतांश वेळा नोटीस बजावली की आपली जबाबदारी संपली असे समजून संबंधित महापालिका किंवा म्हाडासारख्या संस्था हात झटकायला मोकळ्या होतात.*

*त्यातून अतिधोकादायक इमारती कोसळून जीवितहानी होते, लोक रस्त्यावर येतात. शिवाय त्यांची मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी होते, कागदपत्रे गहाळ होतात. पोटापाण्यासाठी लोक आपली गावे सोडून शहराच्या ठिकाणी येतात. नव्या इमारतींमध्ये जागा घेणे त्यांना परवडत नाही. त्यामुळे कमी किमतीत जागा भाड्याने मिळत असेल तर ती घेतात. अशी जागा त्यांना जुन्या इमारतींमध्ये मिळते. इतकेच नव्हे तर अशा जुन्या इमारतींमध्ये ज्येष्ठ नागरिक राहत असतात. त्यांची मुले विदेशात असतात. अशा वेळी ते राहत असलेली इमारत धोकादायक आहे, म्हणून त्यांना रिकामी केली जाण्यास सांगितले तर ते जाणार कुठे? धोकादायक इमारती आणि अनधिकृत झोपडपट्ट्या यांची सरकारी आस्थापनांना पावसाच्या तोंडावरच जाग कशी येते. त्या अगोदर वर्षभर ही मंडळी काय करत असतात? कारण पावसाळा सुरू असताना डोक्यावरचे असलेले छप्पर सोडून माणसे बाहेर कशी जाणार, याचा सरकारने विचार करावा.आताही मुंबईसह महामुंबई परिसरातील नऊ महापालिकांमधील आढावा घेतला तर २० हजार ६०० हून अधिक इमारती धोकादायक आहेत. म्हणजे किमान २२ ते २५ लाख लोकांच्या जीवन-मरणाचा हा प्रश्न आहे. म्हणूनच याकडे खूप गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. एकट्या मुंबईत १३ हजारांहून अधिक तर ठाणे महापालिका हद्दीत साडेचार हजार धोकादायक इमारती आहेत. यावरून लगतच्या दोन्ही शहरांमध्ये छोटा हादरा बसला तरी धोकादायक इमारतींचे काय होईल, याची नुसती कल्पना केलेली बरी. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये विरार पूर्वेच्या नारिंगी परिसरातील रमाबाई अपार्टमेंट ही चार मजली इमारत कोसळली होती. यात १७ लोकांचा जीव गेला होता. तत्पूर्वी जुलै २०२० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोरील भानुशाली इमारत कोसळून ९ रहिवाशांचा बळी गेला होता.इमारत अतिधोकादायक असली तर ती पाडावीच लागते तसेच ज्या इमारती धोकादायक असून सी२ए वर्गश्रेणीत असतात त्या इमारती रिकाम्या करून त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करावी लागते. अशावेळी रहिवाशांना पर्यायी जागा मिळवावी लागते किंवा तशी जागा उपलब्ध करून द्यावी लागते. नेमके हेच होत नसल्यामुळे आणि इमारतीची दुरुस्ती वेळेत होईल, याची खात्री नसल्यामुळे धोकादायक इमारतींमधील लोक पटकन घरे रिकामी करण्यास तयार नसतात, हे वास्तव आहे. कारण सरकारी बाबू केवळ कागदी घोडे नाचवण्यात माहीर असतात. तरीही कागदपत्रे म्हणजे फाईली पटापट पुढे सरकत नाहीत, हा सर्वांचाच अनुभव आहे. शिवाय धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीचे काम वेळेत पूर्ण होईल, याची खात्री तिथले अधिकारीही देऊ शकत नाहीत. अनेकदा कंत्राटदार काम अर्धवट सोडतात किंवा दुरुस्तीचा कालावधी काही कारणांमुळे वाढतो.*

# मेळघाटातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची सलोना प्राथमिक आरोग्य केंद्राला आकस्मिक भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती,**

मेळघाटातील आरोग्य सुविधा अधिक बळकट आणि सक्षम करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या जातील, असा विश्वास जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केला.




नुकतेच जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी धारणी तालुक्यातील सलोना येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला आकस्मिक भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विकास आठवले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र नाडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. केशव कंकाळ, डॉ. शिरसाठ उपस्थित होते. पाहणी दरम्यान जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी संपूर्ण आरोग्य केंद्राच्या स्वच्छतेची तपासणी केली. त्यांनी औषध भांडारातील साठ्याची आणि औषधांच्या मुदतीची जातीने खात्री करून घेतली. प्रसूती गृहातील सर्व वैद्यकीय उपकरणे सुस्थितीत आणि कार्यान्वित असल्याचे पाहिले. तसेच, वीज पुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून त्यांनी प्रत्यक्ष जनरेटर चालू करून त्याची पडताळणी केली. कनिष्ठ सहाय्यक कार्यालयातील कागदपत्रांचे विविध रंगांच्या फाईल्समध्ये केलेले योग्य वर्गीकरण पाहून त्यांनी कर्मचाऱ्यांच्या शिस्तीचे कौतुक केले.

आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची पाहणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. निवासस्थानांच्या किरकोळ दुरुस्तीसाठी तातडीने अहवाल जिल्हा कार्यालयाला सादर करण्याचे निर्देश देत त्यांनी ही दुरुस्ती लवकरच करून दिली जाईल, असे आश्वासन दिले. त्यांनी १०२ रुग्णवाहिका चालकांना सूचना दिल्या की, रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचवणे हे प्राथमिक कर्तव्य असून रुग्णांकडून पैशांची कोणतीही मागणी केल्यास कठोर कारवाई केली जाईल. यासोबतच कुपोषित बालकांवर स्थानिक स्तरावर उपचार व्हावेत, यासाठी बालउपचार केंद्रात आवश्यक बेडची व्यवस्था करून हे केंद्र लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी येरेकर यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती आणि अद्वितीय शौर्य, विद्वत्ता व स्वाभिमान यांचे प्रतीक होते. त्यांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. ते छत्रपती शिवाजी महाराज आणि सईबाई यांचे ज्येष्ठ पुत्र होते. लहानपणीच आईचे छत्र हरपल्यामुळे जिजाऊंनी त्यांना लहानपणापासूनच धर्म, संस्कार, न्याय आणि पराक्रम यांचे शिक्षण दिले.



ते अत्यंत हुशार आणि धाडसी होते. त्यांना संस्कृत, मराठी, हिंदी, फारसी आणि पोर्तुगीज अशा विविध भाषांचे ज्ञान होते. ते शूर योद्धे, कुशल प्रशासक, विद्वान लेखक आणि प्रजाहितदक्ष राजा होते. त्यांच्यातील आत्मविश्वास, धैर्य आणि निर्णयक्षमता विलक्षण होती.

१६८० साली छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठा साम्राज्यावर संकटाचे सावट आले. अशा कठीण काळात १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला. त्यांनी अत्यंत कठोर परिस्थितीत राज्यकारभार सांभाळला. त्या वेळी मुघल, सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज असे अनेक शत्रू स्वराज्याच्या विरोधात उभे होते. संभाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत अनेक युद्धे लढली. त्यांनी मुघल सम्राट औरंगजेबाला जवळपास नऊ वर्षे महाराष्ट्रात अडकवून ठेवले. त्यांच्या युद्धपराक्रमात गोवा परिसरातील पोर्तुगीजांविरुद्धची मोहीम, सिद्दीविरुद्धचा संघर्ष आणि कर्नाटक मोहिमा विशेष उल्लेखनीय आहेत.संभाजी महाराज केवळ युद्धातच नव्हे तर प्रशासनातही कुशल होते. त्यांनी आपल्या राज्यात न्यायव्यवस्था मजबूत केली. प्रजेचे रक्षण, करप्रणाली सुलभ करणे आणि प्रशासन पारदर्शक ठेवणे यावर त्यांनी भर दिला.१६८९ मध्ये संगमेश्वर येथे गद्दारांच्या मदतीने मुघल सैन्याने त्यांना बंदी बनवले. औरंगजेबाने त्यांच्यावर धर्मांतर करण्याचा दबाव टाकला. त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आले. ११ मार्च १६८९ रोजी त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली. पण त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत स्वराज्य आणि धर्मासाठी लढण्याची भूमिका कायम ठेवली.

# शेतकऱ्यांचा कापूस संपला; भावाने घेतली उसळी

### १० हजारांवर भाव : सरकारचे शेतकरी विरोधी धोरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती-** पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाचे दर प्रतिक्विंटल सध्या १० हजार रुपयांच्या वर गेले असून गगनाला भिडले आहे. परंतु ९० टक्के शेतकऱ्यांनी कापूस या अगोदरच विकला असून या भाववाढीचा फायदा झाला नसून व्यापाऱ्याच्या घशात कापूस गेल्यानंतर कापसाचे दर गगनाला भिडल्याने पिकविणाऱ्यांचे हाल आणि व्यापारी पुढारी मालामाल, असे शेतकरी विरोधी उदासीन धोरण प्रशासन राबवित असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. गेल्या खरीप हंगामात अतिवृष्टी आणि निसर्गाने साथ न दिल्याने शेतकऱ्यांना कापसाचे उत्पादन कमी




प्रमाणात झाले आहे तसेच सोयाबीनचे उत्पादनसुद्धा मोठ्या प्रमाणात घटले. काही शेतकऱ्यांना तर सोयाबीन सवंगणीसुद्धा करावी लागली नाही. बहुतांश शेतकऱ्यांना एकरी एक क्विंटल कापसाचे उत्पादन झाले. त्यामुळे शेतकऱ्यांचे पुढील हंगामाचे गणित चुकल्याचे दिसून आले. यावर्षीच्या खरीप हंगामात कापूस आणि सोयाबीनचे पीक अत्यल्प प्रमाणात झाल्याने बऱ्याच शेतकऱ्यांनी कापूस आणि सोयाबीनचे दर वाढतील या आशेने घरात साठवून ठेवले होते. एप्रिलपर्यंत कापसाचे दर वाढ न वाढल्याने शेतकऱ्यांना सात हजार रुपये प्रतिक्विंटल दराने कापूस विकावा लागला. आता मात्र कापसाचे प्रति क्विंटल दर हे १० हजार रुपयांच्या वर गेले आहेत. त्यामुळे या कापसाच्या दरवाढीचा शेतकऱ्यांना कुठलाच फायदा झालेला नाही. सर्व फायदा व्यापारी आणि पुढाऱ्यांना झाला असून शेतकऱ्यांचे मात्र लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे .

# बकरी ईदच्या अगोदर गोवंशाचे टॅगींग करावे

### जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती,** बकरी ईदच्या दिवशी गोवंशाचा बळी देऊ नये, यासाठी पशूसंवर्धन विभागाने प्राण्यांचे टॅगींग करावे, यासाठी महापालिकास्तरावर टॅगींग करण्यासंदर्भात जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात प्राणीक्लेश समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, पशूसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय कावरे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी गोवंशाच्या कत्तलीवर बंदी आहे. जिल्ह्यात कत्तलखाना नसल्याने अवैध कत्तलीचा प्रकार होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यासोबतच नियमानुसार गोवंशाचे मांस बाळगणे आणि इतर राज्यातून मांसाची वाहतूक करणे गुन्हा आहे. गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी शहरात ८ ठिकाणी चेकपोस्ट उभारण्यात आले आहे. गोवंश वाहतुकीसाठी नियम आहेत. त्यामुळे नियमानुसार वाहतूक होत नसल्यास प्राण्यांवरील क्रूरता या कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. गोवशांची कत्तल रोखण्यासह गोवंशाचे लसीकरण, आहार योजना परिणामकारकरित्या राबविणे आवश्यक आहे.

महापालिका क्षेत्रात विना टॅगींगची जनावरे टॅगींग करण्यासाठी जनजागृती करावी. त्यानंतर टॅगींग झालेली नाहीत, अशी जनावरे गोरक्षण संस्थांमध्ये पाठविण्यात यावी. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कत्तलीचे प्रकार रोखण्यासाठी जनावरांच्या अवैध वाहतुकीवर कारवाई करण्यात यावी. न्यायालयात प्रकरण सुरू असताना जप्त केलेले वाहन सोडण्यात येऊ नये, यासाठी न्यायालयात अर्ज सादर करावा. पोलिस आणि परिवहन विभागाने याबाबत कारवाई केल्यास अवैध वाहतूक करणाऱ्यांना धाक निर्माण होण्यास मदत होणार असल्याने परिणामकारक कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

# अमरावतीत १९ मे रोजी 'पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती,**

सुशिक्षित युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक १९ मे २०२६ रोजी 'पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, डेपो रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यामध्ये नागपूर आणि अमरावती येथील नामांकित कंपन्या प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने टॅलेन्टकॉर्प सोल्यूशन प्रा.लि. नागपूर, जाधव गियर्स लि. अमरावती, जिनस इन्फ्रास्ट्रक्चर लि. अमरावती आणि प्रेसिजन मॅपिंग जी.आय.एस. प्रा.लि. अमरावती या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांमधील विविध रिक्त पदांसाठी त्या-त्या शैक्षणिक पात्रतेनुसार कंपन्यांचे प्रतिनिधी उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील आणि पात्र उमेदवारांची जागेवरच नोकरीसाठी निवड केली जाईल.

अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींना रोजगार मिळवून देणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. इच्छुक उमेदवारांनी १९ मे रोजी स्वखर्चाने आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, बायोडाटा आणि पासपोर्ट आकाराच्या फोटोंसह मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. याकरिता उमेदवारांना कोणताही प्रवास भत्ता देय असणार नाही.

मेळाव्याबाबत काही अडचण असल्यास उमेदवारांनी कार्यालयाच्या ०७२१-२५६६०६६, ८९८३४१९७९९ किंवा ८६०५६५४०२५ या क्रमांकावर किंवा amravatirojgargmail.com या ईमेलवर संपर्क साधावा. जिल्ह्यातील गरजू आणि पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# ड्रोन उडवण्याचे दर्जेदार प्रशिक्षण घ्या चक्क मोफत

## अधिकृत परवाना घेऊन सुरू करा व्यवसाय



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती,**

शेती क्षेत्रापासून फोटोग्राफीपर्यंत विविध क्षेत्रांतील कामे अचूक आणि उत्तम पद्धतीने करण्यासाठी आज ड्रोनचा वापर केला जातो. हे ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी लाखो रुपये मोजावे लागतात; मात्र राज्य शासनाच्या एका योजनेअंतर्गत हे प्रशिक्षण चक्क मोफत दिले जाते. एवढेच नव्हे, तर प्रशिक्षणानंतर ड्रोन उडवण्याचा अधिकृत परवानाही दिला जातो. ही योजना अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे राबवली जात आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी अमृत संस्थेच्या जिल्हा कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा किंवा ऑनलाइन अर्ज भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अमृत म्हणजेच महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी, त्यांच्यातून उद्योजक घडवण्यासाठी ही संस्था विविध योजनांसह वेगवेगळ्या प्रकारचे उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमही राबवते. त्यामध्येच ड्रोन पायलट बनण्यासाठीच्या प्रशिक्षणाचाही समावेश आहे. त्यासाठी अमृत ड्रोन मिशन या नावाने मोहीम राबवली जाते. हा प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत दर्जेदार असून, एरव्ही ज्यासाठी किमान लाख-दीड लाख रुपये मोजावे लागतात, तो १० दिवसांचा निवासी कोर्स अमृत संस्थेकडून लक्ष्यित घटकांसाठी मोफत राबवला जातो. या प्रशिक्षणाचा कार्यक्रमाचा लाभ आजपर्यंत शंभरहून अधिक लाभार्थ्यांनी घेतला असून, त्यातील काही जणांनी यातून प्राप्त केलेल्या कौशल्याच्या आधारे चांगली कमाई करण्यासही सुरुवात केली आहे. अमृत संस्थेच्या या दर्जेदार कोर्सची कीर्ती ऐकून गोवा सरकारने आपल्या तीस अधिकाऱ्यांना अमृत संस्थेकडून ड्रोनचे प्रशिक्षण दिले. राज्यात आठ ठिकाणी संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले जाते.

### कोण घेऊ शकते या योजनेचा लाभ?

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही शासकीय संस्था किंवा महामंडळाचा लाभ मिळत नाही अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक हा अमृत संस्थेचा लक्ष्यित गट आहे. त्यामध्ये ब्राह्मण, कायस्थ, कोमटी/वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, नायर, नायडू, कम्मा, कानबी, सिंधी, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, लोहाना, हिंदू नेपाळी व भूमिहार अशा २५ जातींचा सद्यस्थितीत समावेश आहे. अशा जातींमधील वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या व्यक्ती अमृत संस्थेच्या योजनांचा लाभ घेऊ शकतात. कलर बॉक्स कार्यालय कुठे? अर्ज कसा करायचा?पुण्यात औंधमध्ये अमृत संस्थेचे मुख्यालय आहे. तसेच, अमृत संस्थेची कार्यालये राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत. संस्थेचा कारभार पूर्णतः पारदर्शक असून, सर्व प्रक्रिया ऑनलाइन होते. त्यामुळे संस्थेचे कामकाज पेपरलेस आहे. योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांना थेट वेबसाइटवर अर्ज करावा लागतो. अधिक माहिती आपापल्या जिल्ह्यातील कार्यालयाकडून मिळू शकते.

नियम :- उमेदवार वर दिलेल्या लक्ष्यित गटातील असावा आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा.- त्याचे वय १८ ते ५५ वर्षांदरम्यान असावे.- उमेदवार किमान बारावी उत्तीर्ण असावा.- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असावे.- शेतकरी कुटुंबातील उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.- अन्य सर्व कागदपत्रांसह वैद्यकीय अधिकाऱ्याकडून फिटनेस दाखला घेणे आवश्यक.

या योजनेविषयीची सविस्तर माहिती पुढील लिंकवर उपलब्ध असून, त्या लिंकवरूनच योजनेसाठी अर्ज करता येतो. https://app.mahaamrut.org.in/amrut-new/scheme/245

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या 'व्हॉट्सप चॅटबॉट' सेवेचा शुभारंभ

### एकाच क्लिकवर मिळणार अर्जाची स्थिती व कर्ज मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक तसेच गट कर्ज योजनांतील लाभार्थ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'व्हॉट्सप चॅटबॉट' सेवा सुरू करण्यात आली आहे. जपश उश्रळलज्ञ खपर्षी-रींळेप या विशेष संकल्पनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या या सुविधेमुळे आता लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जासंबंधित संपूर्ण माहिती आणि विविध प्रक्रियांची सद्यस्थिती थेट व्हॉट्सपवर तत्काळ प्राप्त होणार आहे.

या अत्याधुनिक सुविधेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी ८९७६८५५९२१ या क्रमांकावर क्ळ असे लिहून पाठवायचे आहे. हा मेसेज पाठवताच लाभार्थ्यांसमोर एक मेनू उपलब्ध होईल, ज्यामध्ये महामंडळ व योजनांची माहिती, नवीन नोंदणी संदर्भातील मार्गदर्शन, पात्रता प्रमाणपत्र स्थिती व ते डाउनलोड करण्याची सुविधा, बँक कर्ज मंजुरी स्थिती आणि व्याज परतावा दावा स्थिती यासारखे पर्याय मिळतील. सुरक्षा लक्षात घेता या सर्व सेवा ओटीपी आधारित पडताळणीद्वारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# नवनीत राणा यांच्या विधानाने भाजपात खळबळ

## प्रवीण पोटे यांच्या राजकीय खुर्चीवर संकटाचे ढग?

### अमरावती भाजपात नव्या संघर्षाची चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती :**
शहरातील भाजपच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीची चिन्हे दिसू लागली आहेत. शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त सांस्कृतिक भवन येथे आयोजित अभीष्ट चिंतन कार्यक्रमात माजी खासदार व भाजप नेत्या नवनीत राणा यांनी केलेल्या एका विधानामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. राजकीय जाणकारांच्या मते, हे केवळ अभिनंदनपर वक्तव्य नसून भविष्यातील विधान परिषद तिकिटाच्या राजकारणाचा स्पष्ट संकेत मानला जात आहे.

कार्यक्रमाला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच माजी आमदार परिषद सदस्य प्रवीण पोटे पाटील उपस्थित होते. याच व्यासपीठावर नवनीत राणा यांनी जनतेला डॉ. नितीन धांडे यांना आमदार म्हणून पाहायचे आहे, असे वक्तव्य केले. हे विधान होताच सभागृहातील वातावरण अचानक बदलल्याचे जाणवले. राजकीय निरीक्षकांच्या मते, हा केवळ गौरव नव्हता, तर भाजपमधील अंतर्गत समीकरणांना दिलेले थेट आव्हान होते.

यानंतर पालकमंत्री बावनकुळे यांनीही अतिशय संतुलित पण अर्थपूर्ण प्रतिक्रिया दिली. त्यांनी महत्त्वाकांक्षा ठेवणे चुकीचे नाही; मात्र तिकीट मिळाले तरच पुढे जाता येते. योग्य वेळ आल्यास पक्ष निर्णय घेईल, असे सांगत दोन्ही बाजूंना संदेश देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे पक्ष सध्या कोणत्याही एका गटाला पूर्ण पाठिंबा देण्याच्या भूमिकेत नसला, तरी अंतर्गत हालचाली वेगाने सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

राजकीय वर्तुळात अशीही चर्चा रंगली आहे की, नवनीत राणा यांनी मुद्दाम प्रवीण पोटे यांच्या उपस्थितीत हे विधान करत अप्रत्यक्ष राजकीय इशारा दिला. त्यांच्या चेहऱ्यावरील मिश्कील भाव आणि वक्तव्याची वेळ यामुळे भविष्यात भाजपमध्ये विधान परिषद तिकिटासाठी नवा संघर्ष उभा राहू शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे.

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर नवनीत राणा अधिक आक्रमक राजकारण करत असल्याचे दिसून येत आहे. याआधीही त्यांनी विविध राजकीय विरोधकांवर थेट टीका केली होती. त्यामुळे आता त्यांचा पुढील राजकीय निशाणा प्रवीण पोटे असू शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे.

दरम्यान, डॉ. नितीन धांडे हे केवळ शहराध्यक्ष नसून त्यांच्यामागे मजबूत सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक पाठबळ असल्याचे मानले जाते. त्यांच्या संस्थात्मक नेटवर्कमुळे आणि आर्थिक ताकदीमुळे पक्षातील त्यांचे महत्त्व सातत्याने वाढत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आगामी स्वायत्त संस्था विधान परिषद निवडणुकीत भाजप मोठा राजकीय डाव टाकू शकतो, असे संकेत मिळत आहेत.

राजकीय निरीक्षकांच्या मते, महापालिका निवडणुकीत नवनीत राणा यांनी युवा स्वाभिमानच्या नगरसेवकांच्या माध्यमातून भाजपला सत्ता टिकवण्यासाठी महत्त्वाची मदत केली होती. त्यामुळे त्या केवळ आक्रमक वक्तव्य करणाऱ्या नेत्या नसून अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राजकीय पावले टाकतात, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

आता संपूर्ण अमरावती जिल्ह्याचे लक्ष आगामी विधान परिषद निवडणुकीकडे लागले असून भाजपकडून उमेदवारी कोणाला मिळणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. डॉ. नितीन धांडे यांना संधी मिळणार की प्रवीण पोटे पुन्हा आपली पकड मजबूत ठेवणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मात्र एवढे निश्चित मानले जात आहे की, नवनीत राणा यांचे हे विधान फक्त वाढदिवसाच्या शुभेच्छांपुरते मर्यादित नसून आगामी राजकीय संघर्षाची सुरुवात ठरू शकते.

# मोबाईल चार्जिंगवर लावताना विद्यार्थिनीचा मृत्यू

### सुरळी येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४वरुड–** नजीकच्या सुरळी येथील १६ वर्षीय विद्यार्थिनी घरी काम सुरू असताना मोबाईल चार्जिंगवर लावायला गेली. तेव्हाच तिला विजेचा जोरदार धक्का बसल्याने तिला तिच्या आई वडिलांनी तत्काळ वरूडच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. सदर घटना बुधवार सायंकाळी साडेसहा वाजताचे दरम्यान घडली. मृत्यूची बातमी गावात पोहचताच सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आली.

प्राप्त माहिती नुसार, जान्हवी किशोर सोनारे (१६) रा. सुरळी ता.वरूड जि.अमरावती असे मृतक युवतीचे नावं आहे. मृतक जान्हवी हीने नुकतीच प्रथम श्रेणीत दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली. अकरावी प्रवेशाकरिता तिची धावपळ सुरू होती. बुधवारी घरी काम सुरू होते. ती सायंकाळी साडेसहा वाजता



मोबाईल चार्जिंगवर लावण्यासाठी प्लगजवळ गेली. तेव्हा तिला विजेचा जोरदार धक्का बसला. प्रकृती गंभीर असताना आई वडिलांसह शेजाऱ्यांनी वरूड येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. आई वडिलांना दोन मुली असून मृतक ही लहान मुलगी आहे. सोनारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सुरळी गावात मृत्यूची बातमी पसरताच सर्वत्र शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# आजपासून पुन्हा शहराचा पाणीपुरवठा होणार विस्कळीत?

### थकीत १८ कोटींच्या बिलासाठी कंत्राटदारांचे पाने जमा आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**
अमरावती शहराचा पाणीपुरवठा पुन्हा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कंत्राटदारांनी थकीत देयकांसाठी आंदोलन तीव्र केले आहे. सन २०२४-२५ चे सुमारे ३.५० कोटी तर २०२५-२६ चे १५.३१ कोटी असे एकूण १८.८१ कोटी रुपयांचे देयक प्रलंबित असल्याचा आरोप कंत्राटदारांनी केला आहे.

या मागणीसाठी ६ मेपासून मजीप्रा कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू असून सातव्या दिवशी आंदोलकांनी पाने जमा आंदोलन करत प्रशासनाचा निषेध नोंदवला. देयके रखडल्यामुळे कामगारांचे वेतन, साहित्य पुरवठा आणि देखभाल खर्च करणे कठीण झाल्याचे कंत्राटदारांचे म्हणणे आहे.

कंत्राटदारांनी पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिल्याने शहरवासीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, मजीप्राच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांसोबत चर्चा सुरू असल्याचे सांगितले. उपअभियंता संजय लेवकर यांनी पाणीपुरवठा बंद होणार नसल्याचा दावा केला असला तरी देयके तातडीने न मिळाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा कंत्राटदारांनी दिला आहे.

# मालखेडच्या सिमेंट प्लांटवर परप्रांतीय मजुरांच्या हत्येचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मालखेड –** चांदूररेल्वे तालुक्यातील मालखेड येथील सिमेंट प्लांटवर चुकून दुसऱ्याच्या खोलीत शिरल्यामुळे मजुरांमध्ये वाद झाला. त्यानंतर दोघांवर प्राणघातक हल्ला करून त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न झाला. विकासकुमार दास गौरी दास व सनोज साहनी (रा. समस्तीपूर, बिहार), अशी हल्ल्यातील गंभीर जखमींची नावे असून, त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. चांदूररेल्वे पोलिसांनी प्रमोद कुरेंद्र साहनी (वय ३२, रा. सिसाई, समस्तीपूर, बिहार) यांच्या तक्रारीवरून चांदूररेल्वे पोलिसांनी संशयित कुलदीप नित्यानंद यादव (वय ३०) व धर्मेंद्र विश्वनाथ साह (वय २६, रा. मुजफ्फरपूर, बिहार) या दोघांविरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. विकासकुमार दास हा बाहेरून आल्यानंतर चुकीने संशयित कुलदीप यादव यांच्या खोलीत गेला होता. लक्षात आल्यानंतर विकासकुमार बाहेर आला. त्याचवेळी संशयित कुलदीप व धर्मेंद्र या दोघांनी वाद घालून त्यास बेदम मारहाण केली. विकासकुमार दास याचा ओरडण्याचा आवाज आल्याने त्याचा मित्र सनोज शालिकराव साहनी हा वाद मिटविण्याकरिता गेला असता दोघा संशयितांनी काठी, वीट आणि दगडाने दोघांवर वार करून त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर प्लांटवर काम करणाऱ्या इतर मजुरांनी वाद मिटवला. जखमीच्या मित्राच्या तक्रारीवरून चांदूररेल्वे पोलिसांनी संशयित कुलदीप व धर्मेंद्र या दोघांविरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# इलेक्ट्रीक केबल चोरी करणाऱ्या अट्टल चोरांना गुन्हे शाखेची बेडी

### ५ गुन्हे उघड, १.९२ लाखांचा मुद्देमाल जप्त




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती–** अमरावती शहरातील नवीन घरांच्या बांधकाम स्थळांवरून इलेक्ट्रीक केबल चोरी करणाऱ्या अट्टल चोरांच्या मुसक्या आवळण्यात अमरावती शहर गुन्हे शाखेला यश आले आहे. या कारवाईत ४ चोरी व १ जबरी चोरी असे एकूण ५ गुन्हे उघडकीस आले असून १ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्तांनी शहरातील रेकॉर्डवरील चोरी व घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांवर पाळत ठेवून प्रभावी कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. पथक पेट्रोलिंग करीत असताना १३ मे २०२६ रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, साहील राउत हा त्याच्या साथीदारासह रेल्वे स्टेशन चौक परिसरात उभा असून त्याने विविध ठिकाणी नवीन बांधकामांवरील इलेक्ट्रीक वायर चोरी केल्या आहेत.

माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने रेल्वे स्टेशन चौक येथे सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या आरोपींना विश्वासात घेतल्यावर त्यांनी शहरातील विविध पोलीस स्टेशन हद्दीतून इलेक्ट्रीक वायर चोरी तसेच जबरी चोरी केल्याची कबुली दिली.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये साहील कैलास राउत (वय २४, रा. गांधी आश्रम, सरकारी संडासजवळ, अमरावती) तसेच एका विधी संघर्षित बालकाचा समावेश आहे. आरोपींकडून गाडगेनगर, राजापेठ व बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीतील एकूण ५ गुन्हे उघड करण्यात आले असून चोरीतील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# मध्य प्रदेशातील विदेशी मद्यसाठा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४अमरावती,**
मध्य प्रदेशच्या सीमेतून जिल्ह्यात विदेशी मद्याची अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असून, त्याद्वारे बनावट मद्यसाठाही येत असल्याचे दिसून येते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाच जणांना अटक करून २५ लाख ३२ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. राजू संपतराव जनबंधू (वय ५९, रा. चिखलदरा), किशोर रामाजी इंगळे (वय ४६, रा. हिवरेखेड, मुलताई, मध्य प्रदेश), अभिषेक रामकिशोर गुप्ता (वय ४३, रा. बरवासागर, झासी, उत्तर प्रदेश), राजू श्रीओमप्रकाश शिवहरे (वय ४२, रा. शिवपुरा, भिवकुंडी, मध्य प्रदेश), रामचंद्र धनपाल अमृत (वय ३०, रा. कोंडरखापा, बैतूल), विजय शिवचरण यादव (वय २६, रा. मडगाधारणा, छिंदवाडा), अशी अटक सहा जणांची नावे असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांनी दिली. गुन्हे शाखेचे पथक चिखलदरा हद्दीत असताना मध्य प्रदेश सीमेतून चिखलदरा ते घटांग मार्गाने विदेशी दारूचा साठा जिल्ह्यात येत होता. पोलिसांनी एमएच ०१ बीबी ४०८८ क्रमांकाचे वाहन थांबवून तपासणी केली. त्यात तीन लाख रुपयांची विदेशी दारू, ज्यात ऑफीसर चॉइस कंपनीचे ४५ बॉक्स, त्यापैकी एक बॉक्समध्ये ९० एमएलच्या ९६ बाटल्या सीलबंद होत्या. एका बॉक्सची किंमत आठ हजार २५६ रुपये, असे एकूण ४५ बॉक्स, ज्याची एकूण किंमत तीन लाख ७१ हजार ५२० रुपये अवैधरीत्या, बिना परवाना वाहतूक करीत असल्याचे आढळून आले. दारू वाहतूक करणाऱ्या वाहनाच्या मागे एमपी १३ झेडपी २७९१, रोख १० लाख रुपये, एमपी ४८ बीसी १७३८, सात लाख रुपये, शिवाय अंगझडतीमध्ये एक लाख २५० रुपयांनी रोकड व सहा मोबाईल, असा एकूण २५ लाख ३२ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# निधीअभावी जिल्ह्यातील ४७ गावांची जलजीवन कामे ठप्प

### उन्हाळ्यात नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून निधीअभावी जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेली ४७ गावांतील पाणीपुरवठा योजना रखडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जिल्हा परिषदेला शासनाकडून सुमारे १८ कोटी रुपयांच्या निधीची प्रतीक्षा असल्याने अनेक कंत्राटदारांनी कामे थांबवली आहेत. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांना ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे.जिल्ह्यात जलजीवन मिशनअंतर्गत एकूण ६६६ कामांना मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी ६०७ कामे पूर्णत्वास गेली असली तरी उर्वरित ४७ कामे अद्याप अपूर्ण आहेत. निधीअभावी या कामांचा वेग मंदावल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.दरम्यान, मेळघाट परिसरातील नऊ गावांमध्ये पाणीटंचाई अधिक तीव्र झाली असून प्रशासनाकडून सध्या २० टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र वाढत्या तापमानामुळे पाण्याची मागणी वाढत असल्याने टँकर व्यवस्थाही अपुरी पडत असल्याची स्थिती आहे.ग्रामीण भागातील महिलांना आणि नागरिकांना दररोज अनेक



किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून रखडलेली कामे पूर्ण करावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाची नवी कार्यकारिणी एकमताने निवड

### विवेक बिंड सलग दुसऱ्यांदा अध्यक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४चांदूर रेल्वे**
चांदूर रेल्वेपासून सुमारे १७ कि.मी. अंतरावर असलेल्या कुऱ्हा येथील शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाची नवीन कार्यकारिणी निवडणूक नुकतीच एकमताने पार पडली. यामध्ये विवेक बबनराव बिंड आणि अमोल रामदास भागवत यांची अनुक्रमे अध्यक्ष व सचिवपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली.

वाचनालयाचे एकूण ११२ आजीव सभासद असून सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी कार्यकारिणी निवडीकरिता एकूण ११ अर्ज प्राप्त झाले होते. इतर कोणतेही अर्ज न आल्यामुळे सर्व पदाधिकारी बिनविरोध निवडून आले. यामध्ये वाचनालयाचे अध्यक्षपदी विवेक बबनराव बिंड, उपाध्यक्षपदी गजानन लक्ष्मनराव बेहरे, सचिवपदी अमोल रामदास भागवत, सहसचिवपदी निलेश रामभाऊ दारोकार , कोषाध्यक्षपदी नितीन रमेशराव नेरकर, सदस्य म्हणून गिरीधर नथुजी रोडगे, किसन



महादेवराव इखार, डॉ. सुनील बापूराव आखरे, मनोज माणिकराव दारोकार, सुधीर रामदास पत्रे, संगीता प्रदीपराव पवार यांची वर्णी लागली आहे.

नवीन कार्यकारिणीने वाचनालयाचा सर्वांगीण विकास साधत ग्रामीण भागातील विद्यार्थी व अभ्यासकांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. निवडीनंतर कुऱ्हा महोत्सवाचे अध्यक्ष राजू टेकाडे, सल्लागार ज्ञानेश्वर मानमोडे, नितीन धांडे, राम इखार, श्याम इखार व नागराज पटले यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# केंद्राच्या निधीअभावी प्रधानमंत्री आवासचे ३५.१३ कोटी अडकले

### घरकुल लाभार्थ्यांमध्ये संताप;

**विदर्भा प्रजासत्ताकदि.१४ अमरावती**
प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांच्या बांधकामाला अलीकडे गती मिळाली असली, तरी केंद्र शासनाकडून निधी न मिळाल्याने तब्बल ३५ कोटी १३ लाख ८५ हजार रुपयांचा निधी रखडली आहे. अनेक लाभार्थ्यांची घरे अंतिम टप्प्यात पोहोचली असून काहींची घरे पूर्ण देखील झाली आहेत. मात्र, शासनाच्या तिजोरीत निधी उपलब्ध नसल्याने लाभार्थ्यांना हप्ते मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

१ एप्रिलपासून ज्या लाभार्थ्यांची घरकुले प्लिंथ लेव्हलपर्यंत पोहोचली आहेत, तसेच ज्या घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे, अशा लाभार्थ्यांचा ११ कोटी ९५ लाख ५हजार रुपयांचा निधी अद्याप प्रलंबित आहे. निधीअभावी स्थानिक प्रशासनालादेखील ऑनलाइन पेमेंटची मागणी नोंदविता येत नसल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, शासनाकडून



घरकुल लाभार्थ्यांसाठी वाढीव ५० हजार रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यातील ३५ हजार रुपये बांधकामासाठी देण्यात येणार असून, अंतिम म्हणजे पाचव्या हप्त्यासाठी जिल्हा प्रशासनाने ३ हजार ७६८ लाभार्थ्यांचे एफटीओ (फंड ट्रान्सफर ऑर्डर) तयार केले आहेत. या लाभार्थ्यांना १३ कोटी १८ लाख ८० हजार रुपये मिळणे अपेक्षित आहे. मात्र, हा निधीदेखील अद्याप खात्यातजमा झालेला नाही. यामध्ये प्लिंथपर्यंत काम पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांचे ६ कोटी १७लाख ८५ हजार रुपये, लिंटल लेव्हलपर्यंत पोहोचलेल्या घरकुलांचे ५ कोटी ३८ लाख ८० हजार तर पूर्ण बांधकाम झालेल्या घरकुलांचे ३८ लाख ४० हजार रुपये थकले आहेत.

# उन्हाळी सुट्टीच्या काळात कुलूपबंद शाळा चोरट्यांच्या निशाण्यावर

## पूर्णवेळ शिपाई तर सुरक्षेच्या दृष्टीने 'सीसीटीव्ही'ही देण्याची गरज

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती –** ग्रामीण भागातील ज्ञानार्जनाचे केंद्र असलेल्या जिल्हा परिषदेच्या मॉडल स्कूल, डिजिटल स्कूल, पोषण आहारातील माल असलेल्या शाळांमध्ये लक्षावधी रुपयांचे साहित्य असते. उन्हाळी दीर्घ सुट्टीमुळे शाळांमध्ये शिक्षक, विद्यार्थी, पालक यापैकी कुणाचाही वावर नसल्याने केवळ शंभर रुपयांच्या कुलपांवर शाळांची सुरक्षा अवलंबून आहे. या संधीचा गैरफायदा घेऊन चोरटे अशा शाळांमध्ये डल्ला मारतात. अशा घटना घडू नये यासाठी प्रशासनाने शाळांच्या सुरक्षेसाठी शिपायासह सीसीटीव्ही यंत्रणा देण्याची गरज आहे. उन्हाळी व दीर्घ सुट्टीच्या काळात कुलूपबंद शाळा तसेच घरेही चोरट्यांच्या निशाण्यावर असतात. जिल्हा परिषदांच्या अनेक शाळांमध्ये संगणक, इंन्टरेक्टीव्ह पॅनल, प्रोजेक्टर, सायन्स लॅब, कम्प्युटर लॅब, खेळांची विविध महागडी साधने, साऊंड सिस्टिम, टी. व्ही., पोषण आहार आदींसह महत्त्वपूर्ण शैक्षणिक साहित्य उपलब्ध असते. अशा परिपूर्ण साहित्याव्दारे मॉडल स्कूल, पीएमश्री, सिएमश्री, डिजिटल स्कूल तसेच भरपूर पटसंख्या व मोठी इमारत असलेल्या जिल्हा परिषदांच्या जिल्ह्यात अनेक शाळा आहेत. दीर्घ सुट्ट्या दरम्यान या शाळांची सुरक्षा शंभर रुपयांच्या कुलपावर असते. चोरटे अशा कुलपांना टॉमी, हातोडी, गज आदींच्या साहाय्याने क्षणात तोडून टाकतात किंवा कडी कोंडा तोडून प्रवेश मिळवतात व लाखोंचे साहित्य चोरून नेतात. सुरक्षा उपाय म्हणून शाळांच्या चोरीच्या घटना टाळण्यासाठी सुरक्षा रक्षक तैनात करणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे गरजेचे आहे. अशा शाळांच्या सुरक्षेसाठी शासनाने शिपाई देण्याची गरज निर्माण झाली आहे. अनेक शाळांमध्ये दीर्घ सुट्ट्यांदरम्यान चोरीच्या घटना यापूर्वी घडलेल्या असून शासकीय मालमत्ता असल्याने पोलिस प्रशासनसुद्धा अशा घटनांना गंभीरतेने बघत नसल्यामुळे चोरांचे फावत आहे. यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान होत असून केवळ शंभर रुपयांच्या कुलपांच्या भरवशावर शाळा न ठेवता शिपायासह सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे गरजेचे आहे.




पुणेच्या धर्तीवर कार्यवाही करावी नुकतेच पुणे जिल्हा परिषदेने ग्रामीण भागातील शाळांमध्ये स्वच्छता, देखरेख आणि दैनंदिन कामकाजासाठी शिपाई (सेवक) नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामपंचायतींनी शाळांमधील शिपाई पदाची आवश्यकता तपासून ग्रामपंचायत स्तरावरून या भरतीबाबत तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकार्!यांनी दिले असून यासंदर्भात अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी काय भूमिका घेतात याकडे जिल्हाभरातील शाळाप्रमुखांचे लक्ष लागले आहे.

# पिंगळाई नदीचे तातडीने रुंदीकरण–खोलीकरण करा

## तळेगाव ठाकूरच्या शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन..





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४तळेगाव ठाकूर**

मौजा विचोरी आणि तळेगाव ठाकूर परिसरातील शेतजमिनीला लागून वाहणाऱ्या पिंगळाई नदीचे तातडीने रुंदीकरण व खोलीकरण करून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी तळेगाव ठाकूर येथील शेतकरी बांधवांनी तिवसा तहसीलदार यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मौजा विचोरी आणि तळेगाव ठाकूर येथील अनेक शेतजमिनी पिंगळाई नदीकाठाला लागून आहेत. दरवर्षी पावसाळ्यात नदी व नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचत असल्याने पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडथळित होतो. परिणामी मुसळधार पाऊस झाल्यास नदीचे पाणी थेट शेतात घुसते. त्यामुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागतो. अनेकदा पाण्याचा निचरा वेळेत न झाल्याने पिके वाहून जातात तसेच सुपीक मातीही खरडून निघते.मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे तळेगाव ठाकूर परिसरात गंभीर पूरस्थिती निर्माण झाली होती. सलग तीन ते चार दिवस पडलेल्या पावसानंतर मध्यरात्री पिंगळाई नदीला आलेल्या पुरामुळे नदीवरील बंधाऱ्यावरून पाणी उसळून थेट गावात शिरले होते. अनेक घरांमध्ये पाणी घुसले होते, तर शेतातील पिके पूर्णतः जलमय होऊन उद्ध्वस्त झाली होती.

विशेषतः ऑगस्ट महिन्यात झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे नदीकाठच्या जमिनी अक्षरशः खरडून निघाल्या होत्या. अनेक शेतकऱ्यांचे उभे पीक वाहून गेले होते. वर्षभराची जमापुंजी खर्च करून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले होते. या कटू अनुभवामुळे यंदाच्या पावसाळ्यापूर्वीच नदी व नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करून पाण्याचा प्रवाह मोकळा करणे अत्यावश्यक असल्याचे शेतकऱ्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.रोजगार हमी योजना तसेच इतर शासकीय योजनांतर्गत हे काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करावे, जेणेकरून भविष्यात शेतकऱ्यांच्या शेतीचे व पिकांचे नुकसान टाळता येईल, अशी अपेक्षा शेतकरी बांधवांनी व्यक्त केली.यावेळी सुरज निमावत, महेश लांजेवार, पियुष पवार, अमोल फटकाळे, जानू राघोर्ते, प्रवीण आखरे, संजय बादशे, मंगेश राऊत, प्रवीण खोब्रागडे, सुनिल घोरमाडे, आशिष जोनवाल यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.–

# मेळघाटातील डॅमवर मत्स्यव्यवसायाला चालना द्या

## महिला बचत गटांना संधी देण्याची युवक काँग्रेसची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

मेळघाट परिसरातील मोठे डॅम व तलाव स्थानिक रोजगार निर्मितीसाठी मत्स्यव्यवसायाकरिता उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ठर्हीश्र धशुरश्रश यांनी केली आहे. डोमा येथील डॅमवर प्रत्यक्ष पाहणी करून स्थानिक नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी ही मागणी मांडली.मेळघाटातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात जलसाठे उपलब्ध असून त्याचा उपयोग महिला बचत गट, स्थानिक शेतकरी व बेरोजगार युवकांसाठी मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून करता येऊ शकतो. शासनाने मत्स्यव्यवसायासाठी हे डॅम व तलाव स्थानिकांना प्राधान्याने उपलब्ध करून द्यावेत तसेच मत्स्यपालनासाठी आवश्यक प्रशिक्षण, आर्थिक मदत व बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राहुल येवले यांनी केली.ते म्हणाले की, मोठे उद्योग प्रत्येक भागात उभारणे शक्य नसले तरी स्थानिक पातळीवर उपलब्ध संसाधनांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करता येऊ शकते. मेळघाटासारख्या दुर्गम भागात मत्स्यव्यवसाय हा प्रभावी जोडधंदा ठरू शकतो. शासनाशी संबंधित विविध संस्था, मत्स्य विभाग व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन महिला बचत गटांना प्रशिक्षण व सहकार्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले.यावेळी संदीप मुंडे, अमोल कोगे, अविनाश पिपरदे, सुभाष पिपरदे, दुक्षत बछले, सुनिल झाडखडे, सुरेश अथोटे, गोलु बछले, संजय बडोदे, बबली तोटे, रिता परते, मिना बेलकर व निर्मला कोगे आदी उपस्थित होते.



# मोर्शी पोलिसांची धडक कारवाई;

## एमडीसह ४.८० लाखांचा मुद्देमाल जप्त



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१४मोर्शी –** अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात मोर्शी पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन आरोपींना एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थासह अटक केली आहे. या कारवाईत ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाला विशेष सूचना दिल्या होत्या.

गोपनीय माहितीच्या आधारे चांदूरबाजार ते मोर्शी रोडवरील स्मशानभूमीसमोरील रेल्वे गेटजवळ १३ मेच्या रात्री ते १४ मेच्या पहाटेदरम्यान नाकाबंदी करण्यात आली. यावेळी पांढऱ्या रंगाच्या टाटा झेस्ट (एमएच ०६ बीपी ०५१६) गाडीची तपासणी केली असता दोन इसम संशयास्पद अवस्थेत आढळले.

आरोपींची नावे अब्दुल हफिज अब्दुल मजीद (वय ३९, रा. बिस्मिल्लाह नगर, लालखडी, अमरावती) व अकिल अहमद जमील अहमद (वय ३२, रा. रेहमतनगर, लालखडी, अमरावती) अशी आहेत. त्यांच्या ताब्यातून ५ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थ किंमत ५० हजार रुपये, दोन अँड्रॉइड मोबाईल किंमत ३० हजार रुपये आणि टाटा झेस्ट कार किंमत ४ लाख रुपये असा एकूण ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# अखेर पेसा क्षेत्रातील भरतीचा मार्ग मोकळा

## मेळघाटात ४०० हून अधिक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती** :पेसा क्षेत्रातील रखडलेली पदभरती अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राज्य शासनाने पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्यानंतर मेळघाटातील ४०० हून अधिक रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. येत्या २१ मेपूर्वी पवित्र पोर्टलवर भरतीची जाहिरात प्रसिद्ध होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार पेसा क्षेत्रातील १७ अधिसूचित संवर्गातील पदभरतीसाठी स्पष्ट नियमावली निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार आरक्षण रचना, रिक्त पदांचे वर्गीकरण, पुनर्नियोजन तसेच पेसा आणि नॉनपेसा क्षेत्रातील समायोजनाबाबत तपशीलवार निर्देश देण्यात आले आहेत.नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार ज्या पेसा क्षेत्रात अनुसूचित जमातींची लोकसंख्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे, त्या भागात मंजूर पदांपैकी ५० टक्के पदे अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. उर्वरित ५० टक्के पदे अराखीव प्रवर्गासाठी राहतील. तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या २५ टक्क्यांपेक्षा कमी असलेल्या क्षेत्रात २५ टक्के पदे अनुसूचित जमातींसाठी, २५ टक्के पदे इतर राखीव प्रवर्गासाठी आणि ५० टक्के पदे खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.दरम्यान, पोलीस पाटील आणि कोतवाल पदांना या तरतुदीतून वगळण्यात आले असून एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत राहील, याची दक्षता घेण्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. विभागाच्या मागासवर्गीय कक्षामार्फत ६ मार्च रोजी याबाबत अधिक मार्गदर्शनही मागविण्यात आले होते. शासनाच्या या निर्णयामुळे मेळघाटातील बेरोजगार युवकांना मोठा दिलासा मिळाला आहे.–

# विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदीचा आग्रह

## पालकांना भुर्दंड : शिक्षण विभागाने लक्ष देण्याची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

जिल्ह्यातील बऱ्याच खासगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदी करण्यास भाग पडले जाते. दरम्यान, याचा भुर्दंड मात्र पालकांना सोसावा लागत असल्याची ओरड आहे. याकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी पालक वर्गाकडून पुढे येत आहे. सध्या शाळांमध्ये प्रवेशाची धूम सुरू आहे. एकीकडे प्रवेशासाठी पालकांच्या शाळेमध्ये चकरा वाढल्या असून दुसरीकडे जिल्ह्यातील बऱ्याच खासगी शाळा पुस्तके, वह्या, बूट, गणवेश विशिष्ट दुकानांमधून खरेदी करण्याचा सूचना देत आहेत. काही ठिकाणी अव्वाच्या सव्वा भाव लावल्या जातो. यामुळे अतिरिक्त बोजा पालकांना सोसावा लागत असल्याची ओरड आहे. महत्त्वाचे म्हणजे याबाबत शासननिर्णय निघालेला आहे. विशिष्ट दुकानातून विद्यार्थ्यांना साहित्य खरेदी करण्यासाठी सक्ती न करण्याचा शासननिर्णय व सूचना असतानाही दरवर्षी काही शाळा या निर्णयाला बगल देत असल्याची ओरड होत असतानाही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई होत नाही. किमान आता तरी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी पालक वर्गाकडून पुढे येत आहे.



शिक्षण उपसंचालकाचे अधिकाऱ्यांना सूचनापत्र सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या खासगी प्राथमिक तथा माध्यमिक शाळांमध्ये गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून खरेदी करण्याची सक्ती न करण्याबाबत परिपत्रक असून शासननिर्णय ११.०६.२००४ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या विषयान्वये सदर बाब अधिनस्त सर्व शाळा व्यवस्थापनांच्या प्रमुखांच्या निदर्शनास आणून देऊन याबाबत त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन होईल, याबाबत दक्षता घेण्याच्या अधिकाऱ्यांना शिक्षण उपसंचालकाचे सूचनापत्रही नुकताच निर्गमित झाले आहे.

> विशिष्ट दुकानातून खरेदी करण्याची शक्ती न करण्याबाबतचे शिक्षण उपसंचालकांचे पत्र सर्व अधिकाऱ्यांना मिळालेले आहे. याचे सर्व शाळांनी पालन करणे अपेक्षित आहे. पालन न करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> **–सतीश मुगल,**
> शिक्षणाधिकारी प्राथमिक.

# नागपूर–पुणे मार्गावरील अनेक गाड्या रद्द, प्रवाशांची गैरसोय वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४नागपूर :** दौंड–मनमाड दुहेरीकरणासाठी मध्य रेल्वेचा विशेष ब्लॉक; नागपूर–पुणे गरीबरथसह विशेष गाड्या रद्द, काही गाड्यांचे मार्ग बदलले. उन्हाळी सुट्ट्या, प्रवेशप्रक्रिया आणि नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत आहे.

**विद्यार्थ्यांसह नोकरदारांची वाढली चिंता–** मध्य रेल्वेच्या पुणे विभागामार्फत दौंड–मनमाड मार्गावरील अकोलनेर, अहिल्यानगर आणि निंबळक स्थानकांदरम्यान दुहेरीकरणाच्या पायाभूत सुविधा उभारणीसाठी प्री–नॉन इंटरलॉकिंग आणि नॉन–इंटरलॉकिंगची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांसाठी विशेष ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक घेण्यात येत असल्याने नागपूर–पुणे मार्गावरील अनेक महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांवर परिणाम होणार आहे. परिणामी काही गाड्या रद्द करण्यात आल्या असून काही गाड्यांचे मार्ग तात्पुरते बदलण्यात आले आहेत.

**गरीबरथ आणि विशेष गाड्या रद्द**

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक १२११४ नागपूर–पुणे गरीबरथ एक्सप्रेस १५ व १७ मे रोजी नागपूरहून रद्द राहील. तसेच १२११३ पुणे–नागपूर गरीबरथ एक्सप्रेस १६ व १८ मे रोजी पुण्याहून धावणार नाही. याशिवाय १२१३६ नागपूर–पुणे विशेष एक्सप्रेस १६ मे रोजी नागपूरहून रद्द करण्यात आली असून १२१३५ पुणे–नागपूर विशेष एक्सप्रेस १७ मे रोजी पुण्याहून सुटणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे आधीच प्रतीक्षा यादीत अडकलेल्या प्रवाशांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. उन्हाळी सुट्ट्या, शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया तसेच नोकरीसाठी नागपूर–पुणे दरम्यान नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ब्लॉकमुळे काही लांब पल्ल्याच्या गाड्यांचे मार्गही बदलण्यात आले आहेत. २२८४५ पुणे–




हटिया एक्सप्रेस १७ मे रोजी पुण्याहून नियोजित मार्गाऐवजी लोणावळा, कर्जत, पनवेल, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड आणि मनमाड मार्गे धावेल. तसेच २२१४० अजनी–पुणे एक्सप्रेस १७ मे रोजी अजनीहून सुटल्यानंतर मनमाड, नाशिक रोड, कल्याण, पनवेल, कर्जत आणि लोणावळा मार्गे वळविण्यात येणार आहे. दरम्यान, १२२२१ पुणे–हावडा दुरांतो एक्सप्रेस १८ मे रोजी पुण्याहून नियोजित वेळेपेक्षा ३० मिनिटे उशिराने सुटणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले.नागपूर–पुणे हा मध्य रेल्वेतील सर्वाधिक व्यस्त मार्गांपैकी एक मानला जातो. विदर्भातून शिक्षण, आयटी क्षेत्र, उद्योग आणि विविध नोकऱ्यांसाठी पुण्यात स्थायिक झालेल्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या मार्गावरील नियमित तसेच विशेष गाड्यांमध्ये वर्षभर मोठी गर्दी असते. वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्यात आली असली तरी सध्या उपलब्ध गाड्यांमध्ये आरक्षण मिळविण्यासाठी प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे.

# उच्च प्राथमिक इयत्तांनाही संचमान्यतेत सवलत द्या

## शिक्षक समितीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती :** २५२०२५–२६ च्या संचमान्यतेत माध्यमिक शाळांच्या इयत्ता ९ वी व १० वीसाठी दिलेली शिक्षक पदांची सवलत उच्च प्राथमिक इयत्तांनाही लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाकडे केली आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने ९ वी–१० वीच्या वर्गांची एकत्रित पटसंख्या २० किंवा अधिक असल्यास तीन शिक्षक पदांना एका वर्षासाठी मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे शिक्षक समितीने स्वागत केले आहे.

समितीचे म्हणणे आहे की, इयत्ता ६ वी ते ८ वी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पाया मजबूत करणारा महत्त्वाचा टप्पा आहे. मात्र सध्याच्या निकषानुसार २० पेक्षा कमी पटसंख्या असल्यास केवळ एकच गणित–विज्ञान शिक्षक पद मंजूर केले जाते. त्यामुळे दोन–तीन इयत्तांचे सर्व विषय एका शिक्षकावर येत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत आहे.१५ मार्च २०२४ चा शासन निर्णय शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी अडसर ठरत असल्याने तो रद्द करून उच्च प्राथमिक शाळांनाही समान न्यायाने सवलत द्यावी, अशी मागणी राज्याध्यक्ष विजय कोंबे व सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शिक्षण विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.